सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२/४७५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश/दहावी नंतरचे प्रथम वर्ष /२०२५/ प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित /३६९ दिनांक : १२/०८/२०२५

**प्रवेशासाठीचा सुधारित अंतिम दिनांक**
**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका**
**अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) या शिखर परिषदेद्वारे दिनांक ११.०८.२०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सुधारित शैक्षणिक वेळापत्रक घोषित केले आहे. त्यास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता तीन वर्ष कालावधीच्या, पुर्णवेळ पोस्ट एसएससी (दहावी नंतरचे) पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी संस्थास्तरीय प्रवेशाचा दिनांक, सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक, संस्थांनी डेटा अपलोड करण्याचा शेवटचा दिनांक या प्रक्रियेच्या वेळापत्रकामधील बदलांच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अनु. | प्रक्रिया | सुरुवात दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पूर्ण शुल्क परताव्यासह प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांक | २९-०८-२०२५ | |
| २. | संस्थेद्वारे तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीनुसार संस्थास्तरीय प्रवेश.-<br>• संस्थेद्वारे अर्ज स्वीकारणे, गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे, प्रवेश प्रक्रियेचा दिनांक इ. बाबतचे वेळापत्रक संस्थेमार्फत घोषित करण्यात येईल.<br>• संचालनालयाद्वारे संस्थेच्या लॉगिनमध्ये यापुर्वी संस्थास्तरीय प्रवेशासाठी उपलब्ध करुन दिलेली उमेदवारांची माहिती व संस्थेकडे उमेदवारांकडून वेळोवेळी प्राप्त होणारे अर्ज यांची गुणवता यादी संस्थेद्वारे तयार करण्यात येऊन संस्थेद्वारे पूर्ण शुल्क परताव्यासह प्रवेश रद्द करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत नियम क्र. १३ व १५ नुसार प्रवेश करावेत. (संचालनालयाकडुन संस्थेच्या लॉगिनमध्ये नव्याने कोणतीही यादी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.)<br>• जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला तर, ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे ती संस्था उमेदवारास एक हजार रुपये वजा करून पूर्ण शुल्क परत करेल. | ०९-०८-२०२५ | २९-०८-२०२५ |
| ३. | अनुक्रमांक २ नुसार संस्थास्तरिय प्रवेश प्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश.-<br>• संस्थेद्वारे अर्ज स्वीकारणे, गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे, प्रवेश प्रक्रियेचा दिनांक इ. बाबतचे वेळापत्रक संस्थेमार्फत घोषित करण्यात येईल.<br>• उपरोक्त २ मध्ये नमुद केल्यानुसार प्रवेशप्रक्रिया पार पाडल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर दि. ३०-०८-२०२५ ते दि. ०४-०९-२०२५ पर्यंत प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर नोंदणी करणा-या व अर्ज निश्चित करण्या-या व संस्थेकडे वेळोवेळी अर्ज सादर करणा-या उमेदवारांचे प्रवेश नियम क्र. १३ नुसार संस्थांनी करावेत. (संचालनालयाकडुन संस्थेच्या लॉगिनमध्ये नव्याने कोणतीही यादी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.)<br>• या कालावधीत, जर उमेदवाराने पूर्वी प्रवेशित संस्थेमधील जागा रद्द करून, नव्याने प्रवेश निश्चित केला, तर ज्या संस्थेतून प्रवेश रद्द केला आहे त्या संस्थेकडून सुरक्षा ठेव आणि सावधता रक्कम वगळता उमेदवाराला त्याच्या कोणत्याही शुल्काचा परतावा मिळणार नाही. | ३०-०८-२०२५ | ०४-०९-२०२५ |
| ४. | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | ०४-०९-२०२५ | |
| ५. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | ०४-०९-२०२५ | |

टिप:

१. प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत सुरू ठेवल्या जातील.

२. संस्थास्तरावरील कोट्यातील व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

३. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात.

४. प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील. दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व संस्था व सुविधा केंद्रे बंद राहतील.

५. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

६. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते **https://poly25.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

७. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

८. मदतकक्ष क्रमांक **7669100257/18003132164** सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई